**प्रेसनोट दिनांक – २६/०६/२०१९**

---

**भरवस्तीत चालणारे जुगाराचा अडडयावर कारवाई**
**पाचजण जेरबंद, एक लाख अडुसस्ट हजाराचा माल जप्त**

---

मा. डॉ के. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहर परिसरातील अवैध रित्या चालणा-या, हुक्का पार्लर, पब, ब्राउन शुगर (हेरॉईन), चरस, गांजा, दारु या अमंली पदार्थाची विक्री करणारे, तसेच अवैध जुगाराचा धंदा करणा-या टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना वेळोवेळी आदेश दिलेले आहेत.

दिनांक – २५/०६/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट – ३ पुणे शहर चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी यांना माहीती मिळाली की शिवाजी रोड सुमारास छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था जवळील हनुमाना मंदीरजवळ नंदु नाईक या नावाचा इसम कल्याण मटका जुगाराचा व्यवसाय करत आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी सदर ठिकाणी छापा टाकला . त्यावेळी तेथे धंदयाचा मालक नंदकुमार बाबुराव नाईक वय - ६२ वर्षे रा - ८७१ शुक्रवार पेठ पुणे त्याचे दोन साथीदार हस्तक इसम नामे २) प्रमोद हिरालाल सेन वय - ४० वर्षे रा. ३७५ शुक्रवार पेठ पुणे. ३) राजेश प्रल्हाद जाधव वय-२७ वर्षे रा. सदर व जुगार खेळण्यासाठी आलेले इसमनामे ४) राजधर मुरलीधर मोहिते वय-२८ वर्षे रा. मंडई झुनका भाकर केंद्राशेजारी बुधवार पेठ पुणे. ५) चंद्रकांत मनोहर एकबोटे वय - ६१ वर्षे रा - ५९६ गंजपेठ पुणे. यांना ताब्यात घेतले आहे. त्याठिकाणी कल्याण मटका या नावाचा जुगार चालु असल्याचे आढळुन आलेले आहे. सदर छाप्यामध्ये रोख रुपये १,६७,४५०/- (एक लाख सदुसष्ट हजार चारशे पन्नास रुपये फक्त) व कल्याण मटका जुगाराची साधन सामुग्री असा एकुण किंमत रुपये - १,६७,८७०/- (एक लाख सदुसष्ट हजार आठशे सत्तर रुपये फक्त) चा ऐवज जप्त करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे मध्यवस्तीत चालणारे जुगार अडयावर कारवाई करुन उध्वस्त करण्यात आलेला आहे. नंदु नाईक याचेविरुध्द यापुर्वीही जुगार कायदयाप्रमाणे गुन्हे दाखल आहेत. सदरबाबत खडक पोलीस स्टेशन पुणे गु र नं – २७८/२०१९ महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. व आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. नंदु नाईक याचेविरुध्द यापुर्वीही जुगार कायदयाप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे, राजकुमार किंद्रे व युनिट ३ मधील पोलीस कर्मचारी सपोफौ दिपक मते, दत्तात्रय गरुड, मच्छिंद्र वाळके, रामदास गोणते, रणजित अभंगे, रोहीदास लवांडे, संदीप राठोड, बलतु घाडगे, कल्याण ननावरे यांनी केली आहे.